पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 2086
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 04 SEP 2023

## परिपत्रक क्र. 52

संदर्भ - १) प्र-कुलगुरु तथा N+२ समिती अध्यक्ष यांचा पुअहोसोविसो/४४३० दि. १५/०७/२०२३ अहवाल.

२) दिनांक २४/०७/२०२३ व्यवस्थापन परीषद ठराव क्र. ०५

३) प्रस्तूत विद्यापीठाचे क्र. सोविसो/२०१६-२०१७/९९१, दिनांक २६/०५/२०१६

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित महाविद्यालय/संस्था यांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र.३ नुसार सर्व महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १५/१०/२०१५ च्या प्रवेशासंदर्भातील नियम व अटी विद्या परिषदेच्या मान्यतेनुसार कळविण्यात आले होते.

तथापि, ब-याच विद्यार्थ्यांनी त्यांच्या निकालाबाबत व प्रवेशाबाबत विद्यापीठाकडे विचारणा केली होती. त्यानुसार विद्यापीठ प्राधिकरणाने प्र-कुलगुरु. तथा N+२ समिती अध्यक्ष डॉ. गौतम कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. संदर्भ क्र.१ नुसार सदर समितीने अहवाल संदर्भ क्र. २ नुसार व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेला आहे. त्यानुसार परीक्षा विभागामध्ये संदर्भ क्र.२ नुसार N+२ कक्ष तयार करण्यात आलेला आहे.

तरी सर्व प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, त्याच्या महाविद्यालयातील N+२ च्या विद्यार्थ्याच्या प्रकरणाबाबत आपला पत्रव्यवहार N+२ या कक्षाकडे करावा. त्यासाठी दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७६५ व np2@sus.ac.in या इमेलवर संपर्क साधावा.

तसेच सदरचे परीपत्रक आपल्या महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवरती व इतर माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवून सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून एकही विद्यार्थी परिक्षेपासून वंचित राहणार नाही याची खबरदारी सर्व महाविद्यालयानी आपल्या स्तरावरून घ्यावी, ही विनंती.

आदेशावरून,

(डॉ. म. स. रोकडे)
प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत :- संदर्भ क्र. १ ते ३

प्रत - १. मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

# सोलापूर विद्यापीठ

परीक्षा विभाग

सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव,

सोलापूर - ४१३ २५५.

ईपीएबीक्स - ०२१७-२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३/७४/७८/७९

फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in

ई-मेल: coe@sus.ac.in

सोलापूर विद्यापीठ

॥ विद्यया संपन्नता ॥

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# Solapur University

Examination Section

Solapur-Pune National Highway, Kegaon,

Solapur-413 255

EPABX No.0217- 2744760/61/63/66/71/72/73/74/74/79

Fax No.0217-2744770

Web Site http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in

email id: coe@sus.ac.in


सोविसो/परीक्षा/२०१६-२०१७/९९१ दि.२६.०५.२०१६

प्रति,

**प्राचार्य/संचालक,**

सर्व संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था,

सोलापूर विद्यापीठ,

**सोलापूर.**

**विषय :** विद्यापीठ अनुदान आयोग यांचे Guidelines on Determination of a Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree या संदर्भातील दि.१५ ऑक्टोबर २०१५ चे पत्रानुसार कार्यवाही करणेबाबत.

**संदर्भ :** प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.१२.१.२०१६ रोजी झालेल्या विद्यापरिषदेतील ठराव क्र.४८.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन विद्या परिषदेच्या दि.१२.०१.२०१६ रोजी झालेल्या बैठकीतील ठरावाद्वारे उक्त Guidelines स्वीकृत केलेल्या आहेत. त्यास अनुसरुन विद्यापीठ अनुदान आयोग यांचे विषयांकीत पत्रात नमूद Guidelines ची वर्ष २०१६-१७ पासून (प्रथम वर्षापासून) अमलबजावणी करणेबाबतचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

त्यानुसार कोणतीही पदवी /पदव्यूत्तर पदवी ही विहीत कालावधीत (अभ्यासक्रम पूर्ण करणेसाठी लागणारा कालावधी).+ २ वर्ष या कालावधीमध्येच पूर्ण करावी लागेल.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे Guidelines चे पत्र सोबत जोडले आहे. तरी सदरील बाब सर्व संबधीत विद्यार्थी, शिक्षक इ.च्या निदर्शनास आणावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**परीक्षा नियंत्रक**

सोबत : १.विद्यापीठ अनुदान आयोग यांचे Guidelines.

# UGC Guidelines on Determination of a Uniform Span Period Within which a Student may be allowed to Qualify for a Degree.

The Commission has observed that universities across the country adopt varying span period within which a student may be allowed to complete a programme to be qualified for a degree. In order to evolve a uniform policy, the Commission had constituted an Expert Committee to consider the issue of determining a uniform span period. On the basis of the recommendations made by the Committee, the Commission has formulated following guidelines for compliance of the universities:

1. Normally, the student is expected to complete his programme within the minimum period as laid down under the relevant Regulation of the university which should be in conformity with the UGC Regulations on the award of First Degree and Masters Degree and also in line with the notification, issued from time to time, on Specification of Degrees under Section 22 of UGC Act, 1956.

2. A student who for whatever reasons is not able to complete the programme within the normal period or the minimum duration prescribed for the programme, may be allowed two years period beyond the normal period to clear the backlog to be qualified for the degree. The general formula, therefore should be as follows:

   a) Time Span = N+2 years for the completion of programme.
      where N stands for the normal or minimum duration prescribed for completion of the programme.

   b) In exceptional circumstance a further extension of one more year may be granted. The exceptional circumstances be spelt out clearly by the relevant statutory body concerned of the university.

   c) During the extended period the student shall be considered as a private candidate and also not be eligible for ranking.

3. Ordinarily, no student should be given time beyond the extended period of two years. However, in exceptional circumstances and on the basis of the merits of each case university may allow a student one more year for completion of the programme.

4. These guidelines are subject to the Rules and Regulations of the statutory bodies and universities governing the grant of degrees.

******

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर-४१३ २५५. (महाराष्ट्र)
Solapur - Pune National Highway, Kegaon, Solapur- 413 255. (M.S)

ई मेल : pvc@sus.ac.in संकेतस्थळ : http://www.sus.ac.in दूरध्वनी Tel. No. +91 0217 2744772 (121)

प्रा. डॉ. गौतम कांबळे
प्र-कुलगुरु

*Prof. Dr. Gautam Kamble*
*Pro-Vice-Chancellor*

जा. क्र. पुअहोसोविसो/ 4430 दि. 15 JUL 2023

प्रति,
**मा. प्रभारी कुलगुरु,**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर.

**विषय : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोग यांचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजीचे Guidelines on Determination of a Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree या नुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये N+२ राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबत प्राप्त झालेल्या महाविद्यालय व विद्यार्थी यांच्या अर्जाविषयी कार्यवाहीच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालाबाबत..**

मा. महोदय,

वरील विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोग यांचे दि. १५ ऑक्टोबर २०१५ रोजीचे Guidelines on Determination of a Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree या नुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये N+२ राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबत प्राप्त झालेल्या महाविद्यालय व विद्यार्थी यांच्या अर्जाविषयी कार्यवाहीच्या अनुषंगाने माझ्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीच्या वेळोवेळी एकूण ५ बैठका झालेल्या आहेत.

या प्रकरणी झालेल्या बैठकांमध्ये विविध मुद्दयांच्या अनुषंगाने विचार होवून तसेच मा.समिती सदस्य यांनी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने व या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून व विद्यापीठ स्तरावरील तद्नुषंगिक विविध बाबी विचारात घेवून तसेच इतर आवश्ययकती कागदपत्रे विचारात घेऊन प्रस्तुत समितीने दि.१४/०७/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये यासंबंधीचा अहवाल अंतिम करुन शिफारशी केलेल्या आहेत. सदर अहवाल व शिफारशी प्रस्तुत पत्रात सोबत जोडण्यात आलेल्या आहेत.

**आपला स्नेहांकित,**

15/7/23

(प्रा. डॉ. गौतम कांबळे)
**प्र-कुलगुरू तथा अध्यक्ष**

सोबत: अहवाल (१ ते १० पाने).

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोग यांचे दि. १५ ऑक्टोबर २०१५ रोजीचे Guidelines on Determination of a Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree या नुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये N+२ राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबत प्राप्त झालेल्या महाविद्यालय व विद्यार्थी यांच्या अर्जाविषयी कार्यवाहीच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल व शिफारसी खालील प्रमाणे.**

विद्यापीठ अनुदान आयोग यांचे Guidelines on Determination of a Uniform span period within which a student may be allowed to quality for a degree या संदर्भात व्यवस्थापन परिषदेच्या १५७ वी बैठकीतील विषय क्र. २(१) नुसार प्रस्तुत विद्यापीठाचे मा. प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली ६ सदस्यीय समिती गठीत करण्यात येऊन सदर समितीचे सदस्य सचिव म्हणून प्रस्तुत विद्यापीठाचे कायदा अधिकारी श्री. जा. म. खैरदी यांनी काम पाहिले. सदर समितीच्या एकूण ०५ बैठका झाल्या. त्यानुसार सदर बैठकीमध्ये वर नमूद प्रमाणे विषयाच्या अनुषंगाने Re-degree संबंधी विविध बाबी विचारात घेण्यात आल्या. त्यानुसार अहवाल व शिफारसी खालील प्रमाणे:

विद्यापीठ अनुदान आयोग यांचे Guidelines on Determination of a Uniform span period within which a student may be allowed to quality for a degree या संदर्भातील दि. १५ ऑक्टोबर २०१५ च्या पत्रानुसार प्रस्तुत विद्यापीठातील विद्यापरिषदेच्या दि. १२/०१/२०१६ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ४८ नुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये सदर Guidelines नुसार शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून (प्रथम वर्षापासुन) अंमलबजावणी करण्याबाबत निर्णय घेऊन त्यानुसार कोणतीही पदवी / पदव्युत्तर पदवी ही विहित कालावधीत (अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी लागणारा कालावधी) + २ वर्ष या कालावधीमध्ये पूर्ण करावी लागेल असे प्रस्तुत विद्यापीठाने दि. २६/०५/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे सर्व संलग्नीत महाविद्यालये / परिसंस्थाच्या प्राचार्य / संचालक यांना कळवून सदर Guidelines ची प्रत पत्रासोबत उपलब्ध करून दिलेली आहे.

तद्नंतर विद्यापीठाकडे संबंधीत अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विहित केलेला कालावधीमध्ये अभ्यासक्रम पूर्ण न करू शकलेल्या विद्यार्थ्यांना सदरचे अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरीता संधी उपलब्ध करून देण्याकरीता विविध अर्ज व संघटनाचे निवेदने प्राप्त झालेले आहेत. या अनुषंगाने विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणापुढे सदरचा विषय विचाराधीन होता.

विद्यापीठ अनुदान आयोग यांचे Guidelines on Determination of Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree संदर्भातील दि. १५ ऑक्टोंबर, २०१५ च्या पत्रानुसार प्रस्तुत विद्यापीठातील विद्यापरिषदेच्या दि. १२/०१/२०१६ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ४८ नुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये N+२ राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबत प्राप्त झालेल्या महाविद्यालय व विद्यार्थी यांच्या अर्जाविषयी कार्यवाही करणेबाबत तसेच Re-Degree संदर्भातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे प्राप्त झालेले अर्ज या विषयी शासकीय बाबींची पडताळणी करून दोन्ही अहवाल स्वतंत्रपणे देणेसाठी व्यवस्थापन परिषदेच्या १५७ वी बैठकीतील विषय क्र. २(१) नुसार प्रस्तुत विद्यापीठाचे मा. प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली ०६ सदस्यीय समिती गठीत करण्यात येऊन सदर समितीचे सदस्य सचिव म्हणून प्रस्तुत विद्यापीठाचे कायदा अधिकारी श्री. जा. म. खैरदी यांनी काम पाहिले. सदर समितीच्या एकूण ०५ बैठका झाल्या. त्यानुसार सदर बैठकीमध्ये वर नमूद प्रमाणे विषयाच्या अनुषंगाने सर्व प्रथम प्रस्तुत विद्यापीठाच्या दि. २६/०५/२०१६ रोजीच्या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या Guidelines विचारात घेण्यात आल्या. सदर Guidelines खालील प्रमाणे:

" The commission has observed that universities across the country adopt varying span period within which a student may be allowed to complete a programme to be qualified for a degree. In order to evolve a uniform policy, the commission had constituted an Expert Committee to consider the issue of determining a uniform span period. On the basis of the recommendations made by the Committee, the Commission has formulated following guidelines for compliance of the universities.

1. Normally, the student is expected to complete his programme within the minimum period as laid down under the relevant Regulations of the university which should be

in conformity with the UGC Regulations on the award of First Degree and Masters Degree and also in line with the notifications, issued from time to time, on Specification of Degrees under Section 22 of UGC Act, 1956.

2. A student who for whatever reasons is not able to complete the programme within the normal period or the minimum duration prescribed for the programme, may be allowed two years period beyond the normal period to clear the backlog to be qualified for the degree. The general formula, therefore should be as follows:
   a) Time Span = N+2 years for the completion of programme.
      Where N stands for the normal or minimum duration prescribed for completion of the programme
   b) In exceptional circumstance a further extension of one more year may be granted. The exceptional circumstances be spelt out clearly by the relevant statutory body concerned of the university.
   c) During the extended period the student shall be considered as a private candidate and also not be eligible for ranking.
3. Ordinarily, no student should be given time beyond the extended period of two years. However, in exceptional circumstances and on the basis of the merits of each case university may allow a student one more year for completion of the programme.
4. These guidelines are subject to the Rules and Regulations of the statutory bodies and universities governing the grant of degrees."

सदर Guidelines नुसार विद्यापीठाने दि. २६/०५/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे सर्व संलग्नीत महाविद्यालये / परिसंस्थानचे प्राचार्य / संचालक यांना खालील प्रमाणे कळविताना सदर Guidelines शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून लागू करण्यात येत असल्याबाबत कळविले.

" विद्यापीठ अनुदान आयोग यांचे Guidelines on Determination of Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree या विषयास अनुसरून विद्या परिषदेच्या दि. १२/०१/२०१६ रोजी झालेल्या बैठकीतील ठरावाद्वारे उक्त Guidelines स्वीकृत केलेल्या आहेत. त्यास अनुसरून विद्यापीठ अनुदान आयोग यांचे विषयांकीत पत्रात नमूद Guidelines ची वर्ष २०१६-२०१७ पासून (प्रथम वर्षापासून) अंमलबजावणी करणेबाबतचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. त्यानुसार कोणतीही पदवी / पदव्युत्तर पदवी ही विहित कालावधीत (अभ्यासक्रम पूर्ण करणेसाठी लागणारा कालावधी) +२ वर्ष या कालावधीमध्येच पूर्ण करावी लागेल.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे Guidelines चे पत्र सोबत जोडले आहे. तरी सदरील बाब सर्व संबंधीत विद्यार्थी, शिक्षक इ. च्या निर्दशनास आणावी, ही विनंती. "

**सुलभ संदर्भासाठी सदर Guidelines मध्ये नमूद N+२+१ हे खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.**

**N (प्रवेशित अभ्यासक्रमाचा कालावधी )+२ (अतिरिक्त संधी)** अशा प्रकारे या संधीमध्ये सदर अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यावर बंधनकारक आहे आणि अपवादात्मक परिस्थितीमध्ये **+१ (विशेष संधी) उपलब्ध करून देण्याबाबत नमूद करण्यात आलेले आहे आणि सदर विशेष संधीमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करणे अनिवार्य आहे.**

त्यानुसार ज्या विद्यार्थ्याने संबंधीत अभ्यासक्रमात प्रवेश घेतल्यानंतर सदरचा अभ्यासक्रम N या कालावधीमध्ये पूर्ण केलेला नाही अशा विद्यार्थ्यांना + २ प्रमाणे संधी उपलब्ध करून देण्याचे आहे. तसेच सदर २ संधीमध्ये देखील ज्या विद्यार्थ्याने अभ्यासक्रम पूर्ण कलेला नाही अशा विद्यार्थ्यांना अशा अपवादात्मक परिस्थितीचा विचार करण्यात येऊन ( Exceptional Circumstances) +१ संधी उपलब्ध करून देण्याबाबत नमूद करण्यात आलेले आहे. त्यानुसार वर नमूद प्रमाणे +१ संधी देण्यात आलेला विद्यार्थी हा Ranking साठी पात्र राहणार नाही या व इतर बाबी सदर Guidelines मध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

सदर Guidelines लागू करण्यात आल्यानंतर दरम्यानच्या कालावधीमध्ये शै. व. २०१९-२०२० व २०२०-२०२१ या कालावधीमध्ये Covid-१९ चा प्रादुर्भाव वाढल्याने महाराष्ट्रसह संपूर्ण देशामध्ये टाळेबंदी (Lockdown) जाहीर करण्यात आली. यामुळे सर्व कामकाज ठप्प होते. अशाच परिस्थितीमध्ये विद्यापीठाच्या पूर्वनियोजित परीक्षा या कारणाने पुढे ढकलण्यात आल्या तसेच विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरीता देखील विविध अडचणीस सामोरे जावे लागले. याबाबत प्रस्तुत विद्यापीटाने वेळोवेळी काढलेले परिपत्रक सोबत जोडण्यात आलेले आहेत. या सगळ्या कारणाने व Covid-१९ च्या प्रार्दुभावामुळे अनेक विद्यार्थ्यांनी आपले पालक गमाविले आहेत. प्रस्तुत विद्यापीठा अंतर्गत विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थी हे ग्रामीण भागातील असून, तसेच सदर कालावधीत विद्यापीठाच्या परीक्षा देखील Online पध्दतीने घेण्यात आल्यामुळे Online परीक्षेसाठी आवश्यक त्या मुलभुत सुविधांची व इतर तांत्रिक बाबींची पुर्तता न करू शकल्याने व तसेच इतर कारणास्तव अनेक विद्यार्थी सदर अभ्यासक्रमाची परीक्षा देऊ शकले नाही अथवा अभ्यासक्रमात उत्तीर्ण होऊ शकले नाही. या सर्व बाबींचा सर्वकश विचार करण्यात आला.

या कारणास्तव वर नमूद प्रमाणे Guidelines मधील मुद्दा क्र. २ मध्ये नमूद करण्यात आलेली तरतूद पुढील प्रमाणे आहे.

" ….

b) In exceptional circumstance a further extension of one more year may be granted. The exceptional circumstances be spelt out clearly by the relevant statutory body concerned of the university.
c) During the extended period the student shall be considered as a private candidate and also not be eligible for ranking.

3) Ordinarily, no student should be given time beyond the extended period of two years. However, in exceptional circumstances and on the basis of the merits of each case university may allow a student one more year for completion of the programme. "

तसेच उक्त कालावधीत विविध विद्याशाखेतील अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना N+२+१ पैकी +१ ची संधी न मिळाल्याने त्यांना त्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करता आले नाही व या कारणाने त्यांच्यासमोर Career निश्चित करण्यासाठी अनेक अडचणी निर्माण होत असल्याबाबत विविध माध्यमाद्वारे विद्यापीठाच्या निदर्शनास आले आहे. तसेच +१ ची संधी न मिळाल्याने अभ्यासक्रम पूर्ण न करू शकलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनेक विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांना त्यांचे प्रवेश रद्द झाल्यास नव्याने प्रवेश घेऊन अभ्यासक्रम पूर्ण करणे हे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसून अभ्यासक्रम पूर्ण करणे शक्य होईल का? याबाबत देखील प्रश्न निर्माण झालेला आहे. या सर्व बाबी विचारात घेता +१ ची संधी विद्यार्थ्यास न दिल्याने त्यांचे अतोनात व कधीही न भरुन येणारे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व तसेच सदर विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहातून बाहेर पडले जाण्याची व ते शिक्षणापासून देखील वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि त्यांच्या भवितव्यास अडचणी निर्माण होऊ नये याचा देखील विचार होणे आवश्यक आहे.

वर नमूद प्रमाणे वस्तुस्थिती व विद्यापीठ अनुदान आयोग यांचे Guidelines on Determination of Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree व तद्नंतर Covid-१९ मुळे उद्भवलेली गंभीर परिस्थिती व वेळोवेळी जाहीर करण्यात आलेली टाळेबंदी तसेच प्रस्तुत विद्यापीठा अंतर्गत विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थी हे ग्रामीण भागातील असून अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी झालेला बदल आणि Online पदधतीने शिक्षण व परीक्षेसंबंधी अनेक अडचणींना सामोरे जावे लागले व या करीता त्यांना मुलभुत सुविधा उपलब्ध नसल्याने उद्भवणाऱ्या विविध तांत्रिक अडचणी इ. विचारात घेता अपवादात्मक परिस्थिती निर्माण झालेली असून, वर संदर्भीत Guidelines मध्ये नमूद प्रमाणे कलम b व c मध्ये नमूद प्रमाणे विशेष बाब म्हणून १ संधी देता येईल काय ? याबाबत सखोल विचार करण्यात येऊन समिती खालील प्रमाणे शिफारस करीत आहे.

## शिफारस :

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व तसेच सदर विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहातून बाहेर पडू नये तसेच ते शिक्षणापासून देखील वंचित राहू नये. या सर्व बाबींचा विचार करता व तसेच Covid-१९ मुळे उद्‌भवलेली गंभीर परिस्थिती व वेळोवेळी जाहीर करण्यात आलेली टाळेबंदी तसेच इतर कारणास्तव निर्माण झालेली अपवादात्मक परिस्थिती इ. मुळे व तसेच अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी झालेला बदल आणि Online पदधतीने शिक्षण व परीक्षेसंबंधी वर नमूद प्रमाणे वस्तुस्थिती व तांत्रिक अडचणी इ. विचारात घेता अपवादात्मक परिस्थिती निर्माण झालेली असल्याने ज्या विद्यार्थ्यांनी खालील नमूद कालावधीत अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला परंतु अभ्यासक्रम पूर्ण करू शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Guidelines मधील कलम b, c व ३ च्या अनुषंगाने व त्याचे पालन होऊन व त्या त्या विद्यार्थ्यास कोणत्या कारणाने सदर अभ्यासक्रम पूर्ण करता आले नाही, अशा विद्यार्थ्यांची केस निहाय पडताळणी करून अपवादात्मक कारणामुळे १ वर्षाची वाढीव संधी - शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये २ सत्र परीक्षेंच्या माध्यमातून खालील तपशीलाच्या अधिन राहून उपलब्ध करून देण्याची शिफारस सक्षम प्राधिकरणाकडे करण्यात येत आहे.

/-
स्वाक्षरीत

पृष्ठ क्र. ४/१०

A) तीन वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ या वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुढील प्रमाणे कार्यवाही सुचविण्यात येत आहे:

| शैक्षणिक वर्ष | वर्ष | कालावधी |
|---|---|---|
| २०१७-२०१८ | प्रथम वर्ष | (N प्रमाणे ३ वर्षाचा कालावधी) |
| २०१८-२०१९ | द्वितीय वर्ष | |
| २०१९-२०२० | तृतीय वर्ष | |
| | | |
| २०२०-२०२१ | | (+२ प्रमाणे २ वर्षाचा कालावधी) |
| २०२१-२०२२ | | |
| | | |
| २०२२-२०२३ | | (Exceptional case नुसार १ वर्षाचा अतिरिक्त कालावधी) |

या प्रमाणे जे विद्यार्थी वर नमूद तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाकरीता प्रवेशित असून प्रथम व द्वितीय वर्षामध्ये (म्हणजे Semester I to IV Clear) उत्तीर्ण आहे आणि त्यांचे सदर अभ्यासक्रमासाठी च्या V and VI or Vth or VI या सत्राच्या परीक्षा देय आहेत अशा विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

तसेच जे विद्यार्थ्यांनी वर नमूद प्रमाणे प्रथम प्रवेश घेऊन प्रथम वर्ष उत्तीर्ण आहे (म्हणजे Semester I and II Clear) आणि अंतिम वर्षा करीता ATKT नुसार प्रवेशित आहे आणि त्यांनी Semester V and VI मध्ये पूर्ण उत्तीर्ण आहेत अथवा Semester V and VI मध्ये अथवा Semester V किंवा VI मध्ये अनुत्तीर्ण आहेत तसेच त्यांचे Semester III and IV or III or IV या सत्रातील काही विषयामध्ये अनुत्तीर्ण आहेत त्यांना देखील वर नमूद प्रमाणे सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**A१) २०१६-२०१७ मध्ये अभ्याक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांबाबत :** *२०१६-२०१७ मध्ये अभ्याक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांबाबत : सदर कालावधीतील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांची* अंतिम संधी (अपवादात्मक परिस्थितीतील +१ संधी) शै. व. २०२१-२०२२ मध्ये येत असल्याने त्यांच्याबाबत देखील विचार होणे आवश्यक आहे.

| शैक्षणिक वर्ष | वर्ष | कालावधी |
|---|---|---|
| **२०१६-२०१७** | प्रथम वर्ष | (N प्रमाणे ३ वर्षाचा कालावधी) |
| २०१७-२०१८ | द्वितीय वर्ष | |
| २०१८-२०१९ | तृतीय वर्ष | |
| | | |
| २०१९-२०२० | | (+२ प्रमाणे २ वर्षाचा कालावधी) |
| २०२०-२०२१ | | |
| | | |
| २०२१-२०२२ | | (Exceptional case नुसार १ वर्षाचा अतिरिक्त कालावधी) |

या प्रमाणे जे विद्यार्थी २०१६-२०१७ मध्ये अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाकरीता प्रवेशित असून प्रथम व द्वितीय वर्षामध्ये (म्हणजे Semester I to IV Clear) उत्तीर्ण आहे आणि त्यांचे सदर अभ्यासक्रमासाठी च्या V and VI or Vth or VI या सत्राच्या परीक्षा देय आहेत अशा विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

तसेच जे विद्यार्थ्यांनी वर नमूद प्रमाणे प्रथम प्रवेश घेऊन प्रथम वर्ष उत्तीर्ण आहे (म्हणजे Semester I and II Clear) आणि अंतिम वर्षा करीता ATKT नुसार प्रवेशित आहे आणि त्यांनी Semester V and VI मध्ये पूर्ण उत्तीर्ण आहेत अथवा Semester V and VI मध्ये अथवा Semester V किंवा VI मध्ये अनुत्तीर्ण आहेत तसेच त्यांचे Semester III and IV or III or IV या सत्रातील काही विषयामध्ये अनुत्तीर्ण आहेत त्यांना देखील

वर नमूद प्रमाणे सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

B) चार वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ या वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुढील प्रमाणे कार्यवाही सुचविण्यात येत आहे:

| शैक्षणिक वर्ष | वर्ष | कालावधी |
|---|---|---|
| २०१६-२०१७ | प्रथम वर्ष | (N प्रमाणे ४ वर्षाचा कालावधी) |
| २०१७-२०१८ | द्वितीय वर्ष | |
| २०१८-२०१९ | तृतीय वर्ष | |
| २०१९-२०२० | चौथा वर्ष | |
| | | |
| २०२०-२०२१ | | (+२ प्रमाणे २ वर्षाचा कालावधी) |
| २०२१-२०२२ | | |
| | | |
| २०२२-२०२३ | | (Exceptional case नुसार १ वर्षाचा अतिरिक्त कालावधी) |

या प्रमाणे जे विद्यार्थी वर नमूद तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाकरीता प्रवेशित असून प्रथम व द्वितीय वर्षामध्ये (म्हणजे Semester I to IV Clear) उत्तीर्ण आहे आणि त्यांचे सदर अभ्यासक्रमासाठी च्या VII and VIII or VII or VIII या सत्राच्या परीक्षा देय आहेत अशा विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

तसेच जे विद्यार्थ्यांनी वर नमूद प्रमाणे प्रथम प्रवेश घेऊन प्रथम व द्वितीय वर्ष उत्तीर्ण आहे (म्हणजे Semester I and IV Clear) आणि अंतिम वर्षा करीता ATKT नुसार प्रवेशित आहे आणि त्यांनी Semester VII and VIII मध्ये पूर्ण उत्तीर्ण आहेत, अथवा Semester VII and VIII मध्ये अथवा Semester VII किंवा VIII मध्ये अनुत्तीर्ण आहेत तसेच त्यांचे V and VI or V or VI या सत्रातील काही विषयामध्ये अनुत्तीर्ण आहेत त्यांना देखील वर नमूद प्रमाणे सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

C) दोन वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ या वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुढील प्रमाणे कार्यवाही सुचविण्यात येत आहे:

| शैक्षणिक वर्ष | वर्ष | कालावधी |
|---|---|---|
| २०१८-२०१९ | प्रथम वर्ष | (N प्रमाणे २ वर्षाचा कालावधी) |
| २०१९-२०२० | द्वितीय वर्ष | |
| | | |
| २०२०-२०२१ | | (+२ प्रमाणे २ वर्षाचा कालावधी) |
| २०२१-२०२२ | | |
| | | |
| २०२२-२०२३ | | (Exceptional case नुसार १ वर्षाचा अतिरिक्त कालावधी) |

या प्रमाणे जे विद्यार्थी वर नमूद तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाकरीता प्रवेशित असून प्रथम वर्षामध्ये (म्हणजे Semester I to II Clear) उत्तीर्ण आहे आणि त्यांचे सदर अभ्यासक्रमासाठी च्या III and IV or III or IV या सत्राच्या परीक्षा देय आहेत तसेच जे विद्यार्थी अंतिम वर्षा करीता ATKT नुसार प्रवेशित आहे अशा विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

C१) **२०१६-२०१७ मध्ये अभ्याक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांबाबत :** सदर कालावधीतील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांची अंतिम संधी (अपवादात्मक परिस्थितीतील +१ संधी) शै. व. २०२०-२०२१ मध्ये येत असल्याने त्यांच्याबाबत देखील विचार होणे आवश्यक आहे.

| शैक्षणिक वर्ष | वर्ष | कालावधी |
|---|---|---|
| **२०१६-२०१७** | प्रथम वर्ष | (N प्रमाणे २ वर्षाचा कालावधी) |
| २०१७-२०१८ | द्वितीय वर्ष | |
| | | |
| २०१८-२०१९ | | (+२ प्रमाणे २ वर्षाचा कालावधी) |
| २०१९-२०२० | | |
| | | |
| २०२०-२०२१ | | (Exceptional case नुसार १ वर्षाचा अतिरिक्त कालावधी) |

या प्रमाणे जे विद्यार्थी शै. व. २०१६-२०१७ मध्ये अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाकरीता प्रवेशित असून प्रथम वर्षामध्ये (म्हणजे Semester I to II Clear) उत्तीर्ण आहे आणि त्यांचे सदर अभ्यासक्रमासाठी च्या III and IV or III or IV या सत्राच्या परीक्षा देय आहेत तसेच जे विद्यार्थी अंतिम वर्षा करीता ATKT नुसार प्रवेशित आहे अशा विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

पृष्ठ ०५.८/९०

D) दोन वर्षाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ या वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुढील प्रमाणे कार्यवाही सुचविण्यात येत आहे:

| शैक्षणिक वर्ष | वर्ष | कालावधी |
|---|---|---|
| २०१८-२०१९ | प्रथम वर्ष | (N प्रमाणे २ वर्षांचा कालावधी) |
| २०१९-२०२० | द्वितीय वर्ष | |
| | | |
| २०२०-२०२१ | | (+२ प्रमाणे २ वर्षांचा कालावधी) |
| २०२१-२०२२ | | |
| | | |
| २०२२-२०२३ | | (Exceptional case नुसार १ वर्षाचा अतिरिक्त कालावधी) |

या प्रमाणे जे विद्यार्थी वर नमूद तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाकरीता प्रवेशित असून प्रथम वर्षामध्ये (म्हणजे Semester I to II Clear) उत्तीर्ण आहे आणि त्यांचे सदर अभ्यासक्रमासाठी च्या III and IV or III or IV या सत्राच्या परीक्षा देय आहेत तसेच जे विद्यार्थी अंतिम वर्षा करीता ATKT नुसार प्रवेशित आहे अशा विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

तसेच ज्या विद्यार्थ्यांचे ज्या विद्यार्थ्यांची M.E. M. Tech ची परीक्षा झालेली आहे परंतु त्यांचे Dessertation सादर करण्याचे राहून गेलेले आहे अथवा सादर करण्यात आलेले आहेत. परंतु ते RRC पुढे पाठविण्यात आलेले नाहीत अथवा त्यांनी सादर केलेले Synopsis मंजुर झालेले नाहीत या कारणाने संबंधीत विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात आलेले आहेत, अशा प्रकरणामध्ये विद्यार्थी निहाय प्रकरणे तपासून संबंधीत विद्यार्थ्यांना सदर बाबी पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

D१) **२०१६-२०१७ मध्ये अभ्याक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांबाबत :** सदर कालावधीतील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांची अंतिम संधी (अपवादात्मक परिस्थितीतील +१ संधी) शै. व. २०२०-२०२१ मध्ये येत असल्याने त्यांच्याबाबत देखील विचार होणे आवश्यक आहे.

| शैक्षणिक वर्ष | वर्ष | कालावधी |
|---|---|---|
| २०१६-२०१७ | प्रथम वर्ष | (N प्रमाणे २ वर्षांचा कालावधी) |
| २०१७-२०१८ | द्वितीय वर्ष | |
| | | |
| २०१८-२०१९ | | (+२ प्रमाणे २ वर्षांचा कालावधी) |
| २०१९-२०२० | | |
| | | |
| २०२०-२०२१ | | (Exceptional case नुसार १ वर्षाचा अतिरिक्त कालावधी) |

या प्रमाणे जे विद्यार्थी शै. व. २०१६-२०१७ मध्ये अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाकरीता प्रवेशित असून प्रथम वर्षामध्ये (म्हणजे Semester I to II Clear) उत्तीर्ण आहे आणि त्यांचे सदर अभ्यासक्रमासाठी च्या III and IV or III or IV या सत्राच्या परीक्षा देय आहेत तसेच जे विद्यार्थी अंतिम वर्षा करीता ATKT नुसार प्रवेशित आहे अशा विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पूर्ण वरण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

E) एम.ई., एम.टेक. या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ या वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुढील प्रमाणे कार्यवाही सुचविण्यात येत आहे:

| शैक्षणिक वर्ष | वर्ष | कालावधी |
|---|---|---|
| २०१६-२०१७ | प्रथम वर्ष | (N प्रमाणे २ वर्षांचा कालावधी) |
| २०१७-२०१८ | द्वितीय वर्ष | |
| | | |
| २०१८-२०१९ | | (+२ प्रमाणे २ वर्षांचा कालावधी) |
| २०१९-२०२० | | |
| | | |
| २०२१-२०२२ | | (Exceptional case नुसार १ वर्षांचा अतिरिक्त कालावधी) |

या प्रमाणे जे विद्यार्थी वर नमूद तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाकरीता प्रवेशित असून प्रथम वर्षामध्ये (म्हणजे Semester I to II Clear) उत्तीर्ण आहे आणि त्यांचे सदर अभ्यासक्रमासाठी च्या III and IV or III or IV या सत्राच्या परीक्षा देय आहेत तसेच जे विद्यार्थी अंतिम वर्षा करीता ATKT नुसार प्रवेशित आहे अशा विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी २ वाढीव संधी (१ वर्षाचा कालावधी) देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

तसेच ज्या विद्यार्थ्यांचे ज्या विद्यार्थ्यांची M.E. M. Tech ची परीक्षा झालेली आहे परंतु त्यांचे Dessertation सादर करण्याचे राहून गेलेले आहे अथवा सादर करण्यात आलेले आहेत. परंतु ते RRC पुढे पाठविण्यात आलेले नाहीत अथवा त्यांनी सादर केलेले Synopsis मंजुर झालेले नाहीत या कारणाने संबंधीत विद्यार्थ्यांचे निकाल राखीव टेवण्यात आलेले आहेत, अशा प्रकरणामध्ये विद्यार्थी निहाय प्रकरणे तपासून संबंधीत विद्यार्थ्यांना सदर बाबी पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

E१) **२०१६-२०१७ मध्ये अभ्याक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांबाबत :** सदर कालावधीतील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांची अंतिम संधी (अपवादात्मक परिस्थितीतील +१ संधी) शै. व. २०२०-२०२१ मध्ये येत असल्याने त्यांच्याबाबत देखील विचार होणे आवश्यक आहे.

| शैक्षणिक वर्ष | वर्ष | कालावधी |
|---|---|---|
| २०१६-२०१७ | प्रथम वर्ष | (N प्रमाणे २ वर्षांचा कालावधी) |
| २०१७-२०१८ | द्वितीय वर्ष | |
| | | |
| २०१८-२०१९ | | (+२ प्रमाणे २ वर्षांचा कालावधी) |
| २०१९-२०२० | | |
| | | |
| २०२०-२०२१ | | (Exceptional case नुसार १ वर्षांचा अतिरिक्त कालावधी) |

या प्रमाणे जे विद्यार्थी शै. व. २०१६-२०१७ मध्ये अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाकरीता प्रवेशित असून प्रथम वर्षामध्ये (म्हणजे Semester I to II Clear) उत्तीर्ण आहे आणि त्यांचे सदर अभ्यासक्रमासाठी च्या III and IV or III or IV या सत्राच्या परीक्षा देय आहेत तसेच जे विद्यार्थी अंतिम वर्षा करीता ATKT नुसार प्रवेशित आहे अशा विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी १ वर्षाचा वाढीव संधी म्हणजे २ सत्र परीक्षाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

वर नमूद प्रमाणे व उक्त कालावधीत प्रवेशित विद्यार्थ्यांना विशेष संधी उपलब्ध करून देण्यासाठी खालील नमूद बाबींचे काटेकोरपणे पालन करून त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

१. सदर शिफारसी मान्य झाल्यानंतर याबाबत विशेष संधी उपलब्ध करून देत असल्याबाबत सर्व Stake Holder यांना अवगत करण्यात यावे, त्या करीता या संबंधी Print Media, Electronic Media, University Website बातमी व जाहीर सुचना देणे.
२. सदर शिफारसी हे वर नमूद अट पूर्ण करणारे विद्यार्थी ज्यांचे प्रवेश रद्द झालेले अथवा करण्यात आलेले नाहीत अशाच विद्यार्थ्यांचा विचार सदर N+२+१ मधील +१ संधी म्हणजे १ वर्ष २ सत्र परीक्षाद्वारे करण्यात यावा.
३. तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या दि. २७/०१/२०२३ रोजीच्या पु.अ.हो.सो.वि.सो/पी.जी.प्रवेश/२०२२/२३० या परिपत्रकाद्वारे वर नमूद निश्चित केलेल कालावधीतील ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश सदर परिपत्रकाद्वारे रद्द करण्यात आलेले आहे, अशा विद्यार्थ्यांना देखील वर नमूद प्रमाणे +१ संधी म्हणजे १ वर्ष २ सत्र परीक्षाद्वारे करण्यात यावा.
४. विद्यापीठसह संलग्नीत महाविद्यालयाचे संचालक / प्राचार्य यांच्यासह विद्यार्थ्यांच्या निर्दशनास सदरची बाब परिपत्रकाद्वारे कळविणे.
५. सदर विशेष संधी शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये (२ सत्र परीक्षाद्वारे) उपलब्ध करून देण्यात यावी.
६. सदर विशेष संधीसाठी वर नमूद तक्त्याप्रमाणे प्रवेशाची व निकषाची अट पूर्ण करणारे विद्यार्थ्यांची संख्या परीक्षा विभागाने तपासून त्या अनुषंगाने संबंधीत विद्यार्थ्यांच्या संकुल / महाविद्यालयास अर्ज भरून घेण्याबाबत कळविणे.
७. सदर विशेष संधीसाठी संबंधीत संकुल / महाविद्यालयाने पात्र विद्यार्थ्याकडून अपवादात्मक परिस्थितीबाबतचे अर्ज परीक्षा Form सोबत जमा करून घेणे. सदर विशेष संधीसाठी संकुल / महाविद्यालयाने Manually Form स्विकारून पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज आवश्यक त्या बाबी (परीक्षा शुल्क, मागील गुणपत्रिका इ.) ची पुर्तता तपासून वर नमूद प्रमाणे तपशीलाची Check List ची पुर्तता करून अर्ज विद्यापीठाकडे सादर करणे.
८. सदर विशेष संधीसाठी पात्र विद्यार्थ्यांची स्वतंत्र परीक्षा जाहीर करणे व परीक्षा घेणे.
९. ज्या अभ्यासक्रमासाठी विशेष संधी देण्यात आलेली आहे, त्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेले Internal Exam, Project, Viva voce, Practical इत्यादींची पूर्तता संकुल / महाविद्यालयाने यांनी करून त्याच्या गुणांसह विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज पाठवावेत. तसेच याबाबत सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे.
१०. ज्या अभ्यासक्रमासाठी RRC ची बैठक आवश्यक आहे, अशा प्रकरणांमध्ये सदर अभ्यासक्रमाचे विषय RRC पुढे प्राध्यान्याने पाठविण्याबाबत विद्यापीठाने आवश्यक ती उपाय योजना करावी.
११. भविष्यात N+२ संबंधी निकषाचे पालन करताना Software च्या माध्यमातून आवश्यक ते निर्बंध न लावल्याने व त्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होऊन विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारले जाऊ नये याबाबत ची आवश्यक ती उपाय योजना विद्यापीठाने करावी.
१२. वर नमूद प्रमाणे +१ संधी म्हणजे १ वर्ष २ सत्र परीक्षाद्वारे संधी देण्यात आलेला विद्यार्थी हा Ranking साठी पात्र राहणार नाही याची दक्षता परीक्षा विभागाने घ्यावी व त्यानुसार गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी.

विद्या परिषद
विषय क्रमांक ( 19 )
दिनांक :- 2 4 JUL 2023

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१९] | **व्यवस्थापन परिषदेच्या १५७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र.२(१) नुसार व्यवस्थापन परिषदेने नेमलेल्या समितीने तयार केलेला N+२ आणि Redegree संदर्भातील परीक्षा व मुल्यमापन विभागाकडे प्राप्त अर्जांवर कायदेशीर बाबींचा विचार करुन तयार केलेले अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: परीक्षा व मुल्यमापन मंडळाकडून विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या Guidelines on Determination of a Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree संदर्भातील दि. १५ आक्टोंबर, २०१५ च्या पत्रानुसार परीक्षा विभागाने प्रस्तुत विद्यापीठातील विद्यापरिषदेच्या दि.१२/०१/२०१६ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ४८ नुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये परीक्षा व मूल्यमापन विभागाने शै. वर्ष २०२२ मध्ये करण्यात आलेल्या कार्यवाहीनुसार ज्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्षांचा कालावधी N+२ नुसार पुर्ण झाला आशा विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी दिली नाही. त्यास अनुसरून विद्यापीठ सल्लग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी परीक्षेस बसण्यास मान्यता मिळावी/संधी वाढून मिळावी याबाबत विद्यापीठाकडे अर्ज सादर केले आहेत. तसेच Redegree संदर्भात अर्ज सादर केले आहेत. या संदर्भात काय कार्यवाही करावी यासाठी दि.२४/०५/२०२३ रोजी पार पडलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर परीक्षा विभागाकडून विषय मांडला असता व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.२(१) नुसार मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली सात लोकांची समिती गठीत करण्यात आली.<br>समितीची कार्यकक्षा ही Redegree & N+२ संदर्भात परीक्षा व मुल्यमापन विभागाकडे प्राप्त अर्जांसंदर्भात समितीने कायदेशीर बाबींची पडताळणी करून दोन्ही विषयांचे अहवाल स्वतंत्रपणे द्यावेत, संबंधीत अहवाल अधिष्ठाता मंडळ, विद्यापरिषद आणि व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर करावेत असा ठराव करण्यात आला.<br>त्यास अनुसरून मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीच्या बैठका दिनांक १) १४/०६/२०२३ २) २१/०६/२०२३ ३) २६/०६/२०२३ ४) ५/०७/२०२३ आणि पाचवी बैठक दि.१४/०७/२०२३ रोजी घेण्यात आली. या बैठकांमध्ये समितीतील सदस्यांनी प्राप्त अर्जांबाबत कायदेशीर बाबींवर विस्तृत चर्चा करून सोबतचे अहवाल सादर केले आहेत.<br>मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेले N+२ आणि Redegree संदर्भातील स्वतंत्र अहवाल दि. २४/०७/२०२३ रोजी होणाऱ्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्यात आले आहेत.<br>व्यवस्थापन परिषदेच्या १५७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र.२(१) नुसार व्यवस्थापन परिषदेने नेमलेल्या समितीने तयार केलेला N+२ आणि Redegree संदर्भातील परीक्षा व मुल्यमापन विभागाकडे प्राप्त अर्जावर कायदेशीर बाबींचा विचार करून तयार करण्यात आलेला अहवाल विचारार्थ. | अभ्यासमंडळ विभाग |
| ठराव: | **व्यवस्थापन परिषदेच्या १५७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र.२(१) नुसार व्यवस्थापन परिषदेने नेमलेल्या समितीने तयार केलेला N+२ आणि Redegree संदर्भातील परीक्षा व मुल्यमापन विभागाकडे प्राप्त अर्जांवर कायदेशीर बाबींचा विचार करुन तयार केलेला अहवाल स्विकारुन सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [०५] | **व्यवस्थापन परिषदेच्या १५७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र.२(१) नुसार व्यवस्थापन परिषदेने नेमलेल्या समितीने तयार केलेला N+२ आणि Redegree संदर्भातील परीक्षा व मुल्यमापन विभागाकडे प्राप्त अर्जांवर कायदेशीर बाबींचा विचार करुन तयार केलेले अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: परीक्षा व मुल्यमापन मंडळाकडून विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या Guidelines on Determination of a Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree संदर्भातील दि. १५ आक्टोंबर, २०१५ च्या पत्रानुसार परीक्षा विभागाने प्रस्तुत विद्यापीठातील विद्यापरिषदेच्या दि. १२/०१/२०१६ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ४८ नुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये परीक्षा व मूल्यमापन विभागाने शै. वर्ष २०२२ मध्ये करण्यात आलेल्या कार्यवाहीनुसार ज्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्षांचा कालावधी N+२ नुसार पुर्ण झाला आशा विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी दिली नाही. त्यास अनुसरून विद्यापीठ सल्लग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी परीक्षेस बसण्यास मान्यता मिळावी/संधी वाढून मिळावी याबाबत विद्यापीठाकडे अर्ज सादर केले आहेत. तसेच Redegree संदर्भात अर्ज सादर केले आहेत. या संदर्भात काय कार्यवाही करावी यासाठी दि.२४/०५/२०२३ रोजी पार पडलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर परीक्षा विभागाकडून विषय मांडला असता व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.२(१) नुसार मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली सात लोकांची समिती गठीत करण्यात आली.<br>समितीची कार्यकक्षा ही Redegree & N+२ संदर्भात परीक्षा व मुल्यमापन विभागाकडे प्राप्त अर्जासंदर्भात समितीने कायदेशीर बाबींची पडताळणी करुन दोन्ही विषयांचे अहवाल स्वतंत्रपणे द्यावेत, संबंधीत अहवाल अधिष्ठाता मंडळ, विद्यापरिषद आणि व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर करावेत असा ठराव करण्यात आला.<br>त्यास अनुसरुन मा. प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीच्या बैठका दिनांक १) १४/०६/२०२३ २) २१/०६/२०२३ ३) २६/०६/२०२३ ४) ५/०७/२०२३ आणि पाचवी बैठक दि.१४/०७/२०२३ रोजी घेण्यात आली. या बैठकांमध्ये समितीतील सदस्यांनी प्राप्त अर्जांविषयी कायदेशीर बाबींवर विस्तृत चर्चा करून सोबतचे अहवाल सादर केले आहेत.<br>मा.प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेले N+२ आणि Redegree संदर्भातील स्वतंत्र अहवाल दि.२४/०७/२०२३ रोजी होणाऱ्या अधिष्ठाता मंडळाच्या आणि विद्यापरिषदेच्या बैठकीसमोर सादर करण्यात आला आहे.<br>सबब, व्यवस्थापन परिषदेच्या १५७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र.२(१) नुसार व्यवस्थापन परिषदेने नेमलेल्या समितीने तयार केलेले N+२ आणि Redegree संदर्भातील परीक्षा व मुल्यमापन विभागाकडे प्राप्त अर्जावर कायदेशीर बाबींचा विचार करून तयार आलेले अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | अभ्यासमंडळ विभाग |
| ठराव: | **व्यवस्थापन परिषदेच्या १५७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र.२(१) नुसार व्यवस्थापन परिषदेने नेमलेल्या समितीने तयार केलेला N+२ आणि Redegree संदर्भातील परीक्षा व मुल्यमापन विभागाकडील प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींचा विचार करुन तयार केलेल्या अहवालाची विद्यापरिषदेने दि.२४/०७/२०२३ रोजीच्या बैठकीत बाब क्र. १९ अन्वये केलेली शिफारस स्विकारुन त्यानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

व्यवस्थापन परिषद
विषय क्रमांक (05)
दिनांक :- 24 JUL 2023